# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 20 October 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २० ऑक्टोबर २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- विजयादशमीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा-रावण दहनासह विविध कार्यक्रमांचं आयांजन
- नागपूरच्या दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तनदिनासाठी मोठ्या संख्येने बौद्ध अनुयायी दाखल
- राज्यभरात अनेक ठिकाणी राजकीय मेळाव्यांसाठी पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साह
- धाराशिव तालुक्यातील कनगरा इथं उमेद अभियानाच्या दाल मिलचं दिमाखात उद्घाटन

आणि

- पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आतापर्यंत सात सुवर्णांसह एकूण ३० पदकं

****

विजयादशमीचा सण आज साजरा होत आहे. आदिशक्तीच्या ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये आज सकाळी महानवमीच्या महापूजेनंतर घटोत्थापन करण्यात आलं, त्यानंतर देवीच्या सीमोल्लंघन सोहळ्यांना प्रारंभ झाला आहे. तुळजापूर इथं तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात आज घटोत्थापन सोहळा पार पडला. उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त ओंकार देशमुख, नगराध्यक्ष तथा विश्वस्त विनोद गंगणे, यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक यावेळी उपस्थित होते.

श्रीक्षेत्र माहूर गडावर आज रेणुका मातेला पूर्ण स्नान घातल्यानंतर आज अलंकार पूजा करण्यात आली. त्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य तसंच विडा प्रसाद अर्पण करण्यात आला. महाआरतीनंतर शस्त्र पूजन करण्यात आलं. गडावरून परशुरामाची पालखी काढण्यात आली.

अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवीच्या सीमोल्लंघनाला दुपारनंतर प्रारंभ झाला. देवीची पालखी शहराच्या विविध भागातून मार्गक्रमण करत असून, भाविकांची विशेषत: महिलांची दर्शनासाठी मोठी गर्दी होत आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा इथल्या तुळजाभवानी माता मंदिरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या. दसऱ्याच्या उत्सवात धार्मिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा बालाजी रथोत्सवही आकर्षणाचा केंद्र बिंदू असतो. शहरातले अनेक नागरिक या रथोत्सवात सहभागी झाले.

दरम्यान, दुष्काळाचं सावट असलं तरीही दसऱ्यानिमित्त बाजारपेठाही सजल्या आहेत. परस्परांना आपटा तसंच शमीची पानं देऊन दसऱ्याच्या शुभेच्छा देतांना नागरिकांचा उत्साह दिसून येत आहे. ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमही होत आहेत. सोने, चांदी आणि मौल्यवान वस्तूंच्या तसंच घरखरेदीचे व्यवहारही आज होत आहेत. अनेक ठिकाणी रावणदहनाचे कार्यक्रम होत आहेत.

शिर्डी इथेही साईबाबा मंदिरात संत साईबाबांच्या १०८व्या समाधी दिन सोहळ्याला प्रारंभ झाला आहे. देशभरातल्या भाविकांनी शिर्डीत दर्शनासाठी गर्दी केली आहे

****

नागपूर इथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबाग इथल्या मुख्यालयात विजयादशमी उत्सव साजरा झाला. सरसंघचालक मोहन भागवत यांनी परंपरेनुसार शस्त्रपूजा करुन स्वयंसेवकांना मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमाला माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.
छत्रपती संभाजीनगर इथं संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त विजयादशमी उत्सव आणि पथसंचलन असे दोन उपक्रम पार पडले. शहरातील रामनगर, चिकलठाणा, हर्सूल,

सिडको, हडको, वानखेडेनगर, जटवाडा, बीड बायपास आणि शिवाजीनगर यांसह दहा परिसरांत स्वयंसेवकांनी पथसंचलन केलं.

****

७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज साजरा होत आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दसऱ्याच्या दिवशी नागपूरच्या दीक्षाभूमीवर आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला होता. तेव्हापासून दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई आणि म्यानमारचे वन्नसिरी महाथेरो यांच्या उपस्थितीत आज संध्याकाळी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा साजरा होत आहे. या निमित्तानं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत. या परिसरातल्या पुस्तकांच्या तसंच विविध प्रतिमांच्या दालनांवरही गर्दी पाहायला मिळत आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मुंबईत दादर इथं बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. भारतीय बौद्ध महासभा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या वतीनं बाबासाहेबांच्या अर्धपुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली गेली.

छत्रपती संभाजीनगर इथं ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील बुद्धलेणीत धम्मभूमीवर आज विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम होत आहेत. प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार केंद्राच्या वतीने आयोजित या महोत्सवात शंभर जणांना श्रामणेर प्रवज्जा देण्यात आली. यावेळी १० ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या श्रामणेर शिबिराचा आज समारोप झाला.

विजया दशमीनिमित्त राजकीय पक्षांचे मेळावेही होत आहेत. प्रमुख आकर्षण असलेला शिवसेनेचा मेळावा मुंबईत गोरेगावात नेस्को मैदानावर, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा मुंबईत शिवाजी पार्क इथे होणार आहे.

नागपूर इथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा सोहळा होणार आहे. बीड जिल्ह्यात पाटोदा तालुक्यात सावरघाट इथे भगवान गडावर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा तर श्री क्षेत्र नारायणगडावर मराठा आरक्षण आंदोलन नेते मनोज जरांगे यांचा मेळावा होणार आहे.

दरम्यान, आज ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं निवासस्थान असलेल्या शुभदीप बंगला, इथून दुष्काळग्रस्तांसाठी मदत साहित्यानं भरलेले ट्रक रवाना करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागरिक, पत्रकार बांधव आणि बळीराजाला सुख, समाधान आणि समृद्धीच्या शुभेच्छा देत “शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊ देणार नाही”अशी ग्वाही दिली.

****

धाराशिव तालुक्यातील कनगरा इथं आज विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अभियानाच्या वतीनं'मिनी दाल मिल प्रोसेसिंग युनिट'चे दिमाखात उद्घाटन करण्यात आलं. ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध व्हाव्यात आणि स्थानिक पातळीवर शेतीमालावर प्रक्रिया करून त्याला योग्य बाजारपेठ मिळावी, या मुख्य उद्देशाने या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. या प्रसंगी कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्हा व्यवस्थापक गुरु भांगे उपस्थित होते. हे मिनी दाल मिल युनिट गावातील शेतकरी आणि महिला बचत गटांसाठी समृद्धीची नवीन पहाट घेऊन आलं सांगत, उपस्थितांनी या उपक्रमाचं मनापासून कौतुक केलं.

****

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांतून लाखो भाविक तुळजापूरकडे पायी येत असतात. या काळात भाविकांची होणारी प्रचंड गर्दी तसंच संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तुळजापूर शहराकडे येणाऱ्या आणि शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहतुकीच्या मार्गांत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. त्यानुसार २३ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून २६ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत निर्धारित मार्गांवर सर्व प्रकारच्या हलक्या आणि जड वाहनांच्या वाहतुकीस मनाई करण्यात आली आहे. या कालावधीत तुळजापूर घाटही सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कीर्ती

किरण पुजार आणि पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी प्राप्त अधिकारांचा वापर करून भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं हे बदल केले आहेत.

****

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी एक लाख रुपये, तर शेतमजुरांच्या प्रत्येक कुटुंबाला २५ हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पशुधनासाठी, विशेषतः मेंढपाळांसाठी स्वतंत्र योजना जाहीर करावी, सरकारने जनसामान्यांच्या समस्या ओळखून काम करावं, अशी अपेक्षाही पवार यांनी व्यक्त केली

****

बीड जिल्ह्यातील परळीच्या वैद्यनाथ प्राथमिक विद्यालयातील पाच सहशिक्षकांच्या मान्यता विभागीय शिक्षण उपसंचालकांनी रद्द केल्या आहेत. शिक्षकांच्या मान्यता आदेशांची पडताळणी करताना जावक रजिस्टर उपलब्ध नसणे, शाळेतील उपस्थितीच्या नोंदींचा अभाव तसंच शालार्थ प्रणालीत नावे समाविष्ट करण्यास झालेला विलंब, अशा त्रुटी आढळल्याचं संबंधित आदेशात नमूद करण्यात आलं आहे.

****

जपानमध्ये सुरु असलेल्या पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आतापर्यंत सात सुवर्ण, दहा रौप्य, तेरा कांस्य अशी एकूण ३० पदकं पटकावली आहेत. पॅरा-ॲथलीट दीप्ती जीवनजी हिने महिलांच्या ४०० मीटर टी२०प्रकारात सुवर्णपदक जिंकलं. तर सृष्टी अरोरा हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल SH1 प्रकारात कांस्य पदक जिंकलं. पुरुष एकेरी टेबल टेनिस प्रकारात मनीष नरवालनं रौप्यपदक पटकावलं. याच प्रकारात जेहान दोराब मदन यानं कांस्यपदक जिंकलं. पुरुष भालाफेक स्पर्धेत प्रदीप कुमारनं रौप्यपदक पटकावलं. या प्रकारात सलग दुसऱ्यांदा रौप्यपदक जिंकण्याची कामगिरी त्यानं केली. याच प्रकारात पदार्पण करणाऱ्या आयुष वर्मानं कांस्यपदक पटकावलं. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटातील पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अशोकनं १९२ किलो वजन उचलण्याची सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक जिंकलं.

महिला एकेरी टेबल टेनिसमध्ये प्राची पांडे हिनं कांस्यपदक पटकावलं. तर, जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या बेबी सहाना रवी हिनंही

कांस्यपदक पटकावलं. आशियाई पॅरा गेम्समध्ये उभं राहून खेळल्या जाणाऱ्या टेबल टेनिस प्रकारात भारताला पहिलं पदक मिळवून देण्याचा ऐतिहासिक मान सहानानं मिळवला.

****

भारत आणि झिम्बॉब्वे महिला क्रिकेट संघात आज तिसरा आणि अखेरचा टी ट्वेंटी सामना रायपूर इथं खेळवला जाणार आहे.

****